# रुटमार्च द्वारे पोलीसांचे शक्ती प्रदर्शन

जा.क्र. ५६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१४/०९/२०१६

दिनांक १४ सप्टेंबर २०१६ ते पुढील ३-४ दिवस पर्यंत भंडारा जिल्हयामधे गणपतीचे विसर्जन होणार आहे. यावर्षी जिल्हयामधे ६३४ सार्वजनिक गणपतीची स्थापणा करण्यात आले आहे तर नोंदणीकृत २५८१ खाजगी गणपतीची स्थापणा करण्यात आली यावर्षी गणपती स्थापणेची संख्या मोठया प्रमाणात असल्याने विसर्जन सुध्दा मोठया प्रमाणात व थाटामाठात होण्याची शक्यता आहे.

जिल्हयामधे गणपती उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन पोलीसांनी आपली योजना आखुन त्या योजनेनुसार आतापर्यंत कार्य केलेले आहे व कोणताही अनुचित प्रकार घडुन आलेला नाही व पुढे सुध्दा विसर्जनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन पोलीसांनी आज रुट मार्च द्वारे ध्वजसंचलन करुन आपल्या शक्तीचे प्रदर्शन केले. रुट मार्चचा उद्देश्य असा आहे की, याद्वारे जनमानसात आपण सुरक्षित आहात असा विश्वासाचा संदेश पोहोचविणे तसेच तसेच पोलीसांची पुर्वतयारी काय आहे याची माहीती लोकांना होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे जनतेने समोर येवुन पोलीसांना सहकार्य करावे. पोलीस आपला मित्र आहे. हा संदेश सुध्दा या माध्यमातुन पोहोचवला जातो.

रुट मार्च मधे मा. विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा, श्री. संजय जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा, श्री. धात्रक, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह) भंडारा, श्री. प्रशांत कोलवाडकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा भंडारा, श्री. गादे, पोलीस निरीक्षक, जिवीशा, श्री. प्रधान, राखीव पोलीस उप निरीक्षक, तसेच आर. सी. पी. पथक, क्युआरटी पथक, होमगार्ड, बॅंड पथक आणि विवीध शाखेचे पोलीस कर्मचारी असे एकुण ३०० पोलीस कर्मचारी हजर होते.

रुट मार्च नियंत्रण कक्ष भंडारा येथुन सुरु होवुन ते जे. एम. पटेल कॉलेज, मुस्लीम लायब्ररी चौक, अण्णाभाऊ साठे चौक, गांधी चौक ते मोठा बाजार येथुन त्रिमुर्ती चौक मार्गे नियंत्रण कक्ष पर्यंत करण्यात आले.

गणपती विसर्जनाचे वेळी नागरीकांनी सतर्क राहुन विसर्जन करावे व लहान मुलांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा यांनी केले आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.